# बृहन्मुंबई महानगरपालिका

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय

डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई-400 008

क्र. एनडीएन/ 3578 दि.27.01.2026

## जाहिरात

मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरी क्र.एमजीसी/एफ/7080 दि.09.07.2025 नुसार, बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील खालील तक्यात नमूद कलेली विविध संवर्गातील पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थानिक पातळीवर जाहिरात देऊन भरण्यात येत आहेत. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जाचे शुल्क कॉलेज इमारत, पहिला मजला, महसूल विभाग (रुम नं.112) येथे रुपये 790/- + 18% जीएसटी रु.143/- एकूण रु.933/- इतके शुल्क **दि.28.01.2026 ते दि.13.02.2026 पर्यंत** कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 03:00 वाजेपर्यंत भरुन, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून पूर्ण भरलेला अर्जा सोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो. रा. वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवक/जावक विभागात **दि.13.02.2026** रोजी संध्याकाळी 05.30 पर्यंत सादर करावा.

विविध पदांसाठी अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीता असलेल्या पदासाठी विहीत अर्हता/अटींची पुर्तता करीत असून सदर कंत्राटी पदाकरिता ते पात्र आहेत. उमेदवाराच्या अर्जात नित्य वापरात असलेला वैध (Valid) ई-मेल आयडी तसेच दूरध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने जाहिरातीत नमूद अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे,अन्यथा अर्ज अवैध ठरविण्यात येईल.

कंत्राटी पध्दतीने भरावयाच्य विविध पदांचा तपशील खालीलप्रमाणे -

**कंत्राट कालावधी : नेमणुकीच्या दिनांकापासून ते 31.03.2027 पर्यंत**

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण भरावयाचे पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1. | कनिष्ठ व्यवसायोपचारतज्ञ | 01 | रु.40000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा B.Sc (OT) (बी.एस.सी (व्यवसायोपचार) / B.O.Th. (बॅचलर ऑफ ऑक्युपेशनल थेरपी) पदवीधारक असावा.<br>2. उमेदवार महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई येथे नोंदणीकृत असावा.<br>3. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>4. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने/तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आहे. |
| 2. | ऑर्थोटिक तंत्रज्ञ | 01 | 20000/- | 1. उमेदवार आरसीआय मान्यमाप्राप्त कोणत्याही संस्थेतून प्रोस्थेटिक्समध्ये बॅचलर (बी.पी.) पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा. |
| 3. | व्ही. सी. तंत्रज्ञ (E.C.G.) | 01 | 18000/- | 1. उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा कार्डिओ-टेक्नोलॉजी (Cardio-Technology) विषयातील बी.पी.एम.टी.(Bachelor in Paramedical in Cardio-Technology)3 1/2 वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा.<br>किंवा<br>उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान (B.Sc in Physics) पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा. व त्यांस व्ही.सी / E.C.G. मधील कामाचा 6 महिन्याचा अनुभव असावा.<br>2. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>3. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने / तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. |
| 4. | क्ष-किरण सहाय्यक | 08 | रु.16000/- | 1. उमेदवार 12 नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्ष-किरण विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ 3 वर्षाचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्यांची इंटरशीप पुर्ण केलेली असावी.<br>किंवा<br>2. उमेदवार 12 वी(विज्ञान)/ 12 वी (MCVC) आणि रेडीओग्राफी डिप्लोमा उत्तीर्ण असावा.<br>3. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>4. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने / तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. |
| 5. | प्रयोगशाळा सहाय्यक | 09 | रु.16000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा रसायनशास्त्र (Chemistry)/सुक्ष्मजीवशास्त्र(Microbiolgoy)/जीवरसायनशास्त्र (Biochemistry) / जैविकतंत्रज्ञ(Biotechnology) या मुख्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | विषयासह विज्ञान शाखेतील पदवी(Degree in B.Sc) उत्तीर्ण असावा.<br>2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>3. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने / तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. |
| 6. | नोंदणी सहाय्यक (डेटा एंट्री ऑपरेटर) | 02 | 18000/- | 1. i) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक(S.S.C.) शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>आणि<br>ii) वाणिज्य/विज्ञान /कला/ विधि किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा.<br>2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>3. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने/तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी/जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवाराला संगणकातील ऑपरेटिंग सिस्टीम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशिट, प्रेझेंटेशन, डेटाबेस, सॉफ्टवेअर, ई-मेल आणि इंटरनेट इ. विषयी उत्तम ज्ञान असावे. राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| 7. | भौतिकशास्त्रज्ञ (किरणोत्सर्ग सुरक्षा अधिकारी) | 01 | रु.50000/- | 1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा फिजीक्स या विभागातील एम.एस.सी ही पदव्युत्तर पदवीधारक आणि रेडीओलॉजिकल फिजीक्स (Diploma in Radiological Physics) पदवीधारक असावा.<br>किंवा<br>उमेदवार मेडीकल फिजीक्स मधील पदव्युत्तर पदवीधारक (M.Sc in Medical Physics) असावा किंवा परमाणु ऊर्जा नियामक मंडळाची (एईआरबी)मुलभूत पात्रता म्हणून मान्यताप्राप्त इतर कोणतीही पदव्युत्तर पदवी/डीप्लोमा धारक असावा.<br>2. किमान अनुभव-उमेदवारास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | I) कर्करोग चिकित्सा रुग्णालयात किमान तीन वर्ष भौतिकशास्त्रज्ञ/वैद्यकियभौतिकशास्त्रज्ञ म्हणून काम करण्याचा अनुभव असावा.<br>II) भारतीय वैद्यक परिषदेच्या (एमसीआय) मान्यताप्राप्त वैद्यकिय महाविद्यालयातील भौतिकशास्त्रज्ञ/वैद्यकिय भौतिकशास्त्रज्ञ म्हणून किमान तीन वर्ष काम करण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.<br>3. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रीका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>4. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने / तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. |
| 8. | रक्त संक्रमण अधिकारी | 01 | रु.90000/- | 1. उमेदवार मेडिसीन -एम.डी. (पॅथॉलॉजी/ ट्रान्सप-युजन मेडिसीन) मध्ये पदव्युत्तर पदवीधारक असावा अथवा<br>2. पॅथॉलॉजी वा ट्रान्सफ्युजन मेडीसीनमधील पदवीकेसह मेडिसीन पदविकेसह मेडिसीनमधील पदवी(एमबीबीएस) तसेच रक्त गट सेरॉलॉजी, रक्त गट मेथडॉलॉजी आणि रक्त पुरवठयातील वैद्यकिय,तत्त्वे आणि / अथवा त्यासंबंधातील घटक तयार करण्यासबंधांतील पुरेसे ज्ञान असावे. अथवा<br>3. नियमित सेवाकाळात एक वर्षासाठी रक्तपेढीतील अनुभवासह मेडिसीनमधील पदवी (एमबीबीएस) आणि त्याबरोबर, रक्तगट सेरॉलॉजी, रक्तगट मेथडॉलॉजी आणि पुरवठयातील वैद्यकिय तत्त्वे आणि/अथवा त्यासाठीचे घटक तयार करण्यासंबंधातील पुरेसे ज्ञान व अनुभव असावा. (पदवी अथवा पदविका केंद्रसरकारद्वारा मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील असावी.)<br>4. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>5. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधील सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने / तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. |
| 9. | नेफ्रोलॉजिस्ट | 01 | रु.100000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची डिएम/ डिएनबी (नेफ्रोलॉजिस्ट) पदवी प्राप्त केलेला असावा.<br>2. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 3. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने / तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| 10. | एम.बी.बी.एस.डॉक्टर | 02 | रु.90000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमबीबीएस पदवी प्राप्त केलेला असावा.<br>2. उमेदवार महाराष्ट्र मेडिकल काउंसिल मध्ये रजिस्टर्ड असावा.<br>3. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>4. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने /तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| 11. | मेडीकल ऑन्कोलॉजिस्ट | 02 | रु.50000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची डीएम/डीएनबी (मेडीकल ऑन्कोलॉजी) पदवी प्राप्त केलेला असावा.<br>2. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>3. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने/तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| 12. | पेडीयास्ट्रीशन<br>(सहा प्राध्यापक ) | 01 | रु.100000/- | 1. उमेदवाराकडे NMC मान्यताप्राप्त किमान पदव्युत्तर पात्रता MD/DNB बालरोगतज्ञ असावी. त्यांना बालरोगतज्ञामध्ये काम करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>2. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>3. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा'ए' स्तर वा 'ब' स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने/तिने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| 13. | ए.आर.सी सल्लागार (Psychology Counsellor) | 01 | रु.50000/- | 1. उमेदवाराकडे सीजीसी मान्यताप्राप्त विद्यापिठातून कौन्सिलिंग सायकोलॉजिस्टमध्ये M.A./M.Phil ही किमान पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक आहे आणि त्यांना किमान एक वर्षाचा अनुभव असलेले आरसीआय नोंदणी असणे आवश्यक आहे.<br>2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>3. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने / तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| 14. | डेटा एंट्री ऑपरेटर(HMIS) | 02 | रु.18000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वाणिज्य/विज्ञान/कला/ विधि किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा.<br>2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>3. उमेदवारान शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी किमान 30 शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असावे. |

वयोमर्यादा : उमेदवाराचे वय **18** वर्षापेक्षा कमी व **38** वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**निवडीचे निकष व कार्यपध्दती :**

**1.**सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीच्या प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करुन, निवड यादी तयार करण्यात येईल.सदर निवड यादी बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल.

**2. मुलाखतीचे ठिकाण दिनांक व वेळ :** बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल. दुरध्वनी / ई-मेल द्वारे कळविण्यात येणार नाही.

**3. शुल्कासह अर्ज करण्याचा कालावधी: दि.28.01.2026 ते 13.02.2026**

**4.** अर्जाचे शुल्क: रुपये 790/- + 18% जीएसटी रु.143/- = एकूण रु.933/ सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**5.** सर्वसाधारण अटी:

- कंत्राटी तत्वावर करण्यात आलेली नेमणूक ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची आहे.
- कंत्राटी तत्वावर करण्यात आलेली नेमणूक आवश्यक नसल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.
- सदर नेमणूक नियमित स्वरुपाची नसल्यामुळे काही अपरिहार्य परिस्थिती उद्भवल्यास कुटलेही कारण न देता निवड यादी रद्द करण्याचे अधिकार प्रशासनाकडे असतील..

- नेमणूक केलेल्या उमेदवारास कंत्राटी तत्वावरील नेमणूक नियमित स्वरुपात करण्यासाठी कोणताही दबाब किंवा न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
- अर्जदाराने अर्ज स्वहस्ताक्षरात भरावा, अपूर्ण अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- सध्याचा पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर लावण्यात यावा.
- पत्रव्यवहारकरिता उमेदवाराने आपला घरचा पत्ता पिन कोडसहीत अर्जात पूर्ण भरावा. तसेच संपर्क साधण्यासाठी भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी नमूद करावेत.
- कंत्राटी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
- उमेदवाराचे विवाह झाले असल्यास विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
- उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास उमेदावाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
- त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 180 दिवसापूर्वी एक दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.
- नेमणूक केलेल्या उमेदवारास मा.संचालक (वै.शि.व.प्र.रु.) यांच्या परिपत्रक क्र.संचालक/ वै.शि.प्र.रु./3644 दि.14.10.2022 अन्वये नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील व इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाही.
- कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता(नायर) यांच्याकडे राहील.
- नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडून रु.500/- बॉड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.
- सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
- कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
- बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई-400 008 येथे रुग्णालयात कोणत्याही विभागात तीन पाळीत काम करावे लागेल.
- उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
- निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर कुटलेही कारण न देता थांबविण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता(नायर) यांना आहेत.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये कंत्राटी तत्त्वावर काम करणा-या अनुभवी उमेदवारास प्रथम प्राधान्य देण यात येईल.
- जे उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर खात्यामध्ये कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असल्यास त्यांनी संबंधित विभाग/

खातेप्रमुख यांचे  ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**6. विशेषसुचनाः**

- यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही  याची नोंद घ्यावी.
- अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची नोंद घ्यावी.
- टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
- निवड झालेल्या उमेदवारास पोलिस ठाण्याचे  चारित्र्य पडताळणी बाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

**सोबतः अर्जाचा नमुना**

Sd/-

**अधिष्ठाता**

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय

व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय

**Form No.**

## बृहन्मुंबई महानगरपालिका

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय
डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई-400 008

पावती क्र……………………. दि………………..

अर्जाचा नमुना

पदाचे नाव -
प्रति,
अधिष्ठाता,
बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय
मुंबई – 400008

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय मुंबई – 400008 येथे कंत्राटी तत त्वावरील ____________________ या पदाकरिता दिनांक ____________________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे.

माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

1) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम ) : ____________________________________________________________

2) भ्रमणध्वनी क्रमांक : ____________________________________________________________

3) ई-मेल आयडी : ____________________________________________________________

4) कायमचा पत्ता : ____________________________________________________________
____________________________________________________________

5) पत्रव्यवहाराचा पत्ता : ____________________________________________________________
____________________________________________________________

6) पदाचे नाव : ____________________________________________________________

7) शैक्षणिक अर्हता : ____________________________________________________________

8) जन्मदिनांक : ____________________________________________________________

9) वय - दिनांक _______________ रोजी असलेले वय ___________ महिने ____________ दिवस__________

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतुनसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती

दिनांक :

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराचे सही

(अर्जदाराचे नाव)

**<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>**

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय

डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई-400 008

**वैयक्तिक माहिती (BIO-DATA)**

1) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम ) मराठीत

:_______________________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव

:_______________________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता)

:_______________________________________________________

4) पत्ता :_______________________________________________________

5) दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक

:_______________________________________________________

6) ई-मेल आयडी

:_______________________________________________________

7) लिंग - पुरुष / स्त्री

8) जन्मदिनांक : दिनांक_____________ महिना _____________ वर्ष________________

दिनांक ______________ रोजी असलेले वय __________ महिने ___________ दिवस _________

9) शैक्षणिक अर्हता :

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |
| फेलोशिप | | | | | | | |

10) अनुभव :

_________________________________________________________________

11) स्थानिक पोलिस ठाण्याचा पूर्ण पत्ता :

________________________________________________________

12) उंची : ______ फूट : _____इंच, वजन : _____कि.ग्रॅ., शरीराची ठेवण : किरकोळ / मध्यम / सुदृढ

वर्ण _____, नेत्र वर्ण : ________________ वैयक्तिक खूण : ________________

13) संगणक विषयक ज्ञान : MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या

संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र : आहे / नाही

14) उमेदवाराने शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी

किमान 30 शब्द प्रती मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र : आहे / नाही / संबंधित नाही

15) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशिल :_____________________________________________________

कार्यरत संस्था/ विभाग / यांचे ना-हरकत प्रमाणपत्र __________________________________________

16) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित /

प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशिल द्यावा. होय / नाही

17) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, होय / नाही

शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित

प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक :

ठिकाण :